# [illegible] संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१

**E-mail :- desk5@dte.org.in** **Web :- http://www.dte.org.in**


क्रमांक : ५(३)/एआयसीटीई/वेनि/२०१२/२२५०१
दिनांक : १२ मार्च, २०१२

प्रति,
अध्यक्ष,
महाराष्ट्र गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक टीचर्स
(गॅझेटेड वर्ग-१) वेलफेअर असोसिएशन,
कराड, जि. सातारा

**विषय : सहावा वेतन आयोग चुकीची वेतन निश्चिती आंदोलनाबाबत...**

संदर्भ : आपले क्रमांक एमजीपीटीडब्ल्यूए/५१६, दिनांक ३ मार्च, २०१२

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन निवेदनाच्या अनुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यांत येत आहे.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांतील शिक्षकांना ६ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत आपण केलेल्या मागणीबाबत या कार्यालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यांत आलेला होता. तथापि, वित्त विभागाने सदरचा प्रस्ताव नामंजूर केलेला आहे.

तसेच दिनांक ५ मार्च, २०१२ रोजी आपली मा. मंत्री महोदय, तसेच अ. भा. तं. शि. परिषदेचे अध्यक्ष यांचेशी झालेल्या चर्चेअंती सदरच्या दुरुस्तीबाबत दोन महिन्यात कार्यवाही करण्याबाबतचे आश्वासन अ. भा. तं. शि. परिषदेच्या अध्यक्षांनी मा. मंत्री महोदयांना दिलेले आहे.

तरी, सदरची वस्तुस्थिती लक्षात घेता, आपण दिलेल्या निवेदनाबाबत फेरविचार करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन, सदरचे आंदोलन अ. भा. तं. शि. परिषद/शासनाकडून अंतिम निर्णय होईपर्यंत करण्यांत येऊ नये.

(सही)
( डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा. मुंबई

पृ.पत्र क्र.विकाऔ/**आस्था-१**/२०१२/ 9939
दिनांक :- 12 MAR 2012

प्रति,
**प्राचार्य,**
शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय, औरंगाबाद
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद
**प्राचार्य,** शासकीय तंत्रनिकेतन,
औरंगाबाद/जालना/अंबड/जितूर/हिंगोली/नांदेड/बीड/उस्मानाबाद/लातूर/शा.नि.म.तं.लि.लातूर
**उपसचिव,** महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

उपरोक्त पत्रात नमुद वस्तूस्थिती अन्वये आंदोलनाची कृती बेकायदेशीर /नियमबाहय असल्याचे आपल्या संस्थेतील शिक्षकांच्या निदर्शनास आणून देउन आंदोलन न करण्याबाबत कळविण्यात यावे.

(सही)
**( महेश शिवणकर )**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**

**प्रत : मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव.**